॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

जा. क्र. उमवि/7-ग/Circular/MKCL/ 4134 /2010 दिनांक :- 06/ 08/2010

प्रति,
मा.प्राचार्य / प्राचार्या / संचालक
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत सर्व
व मान्यताप्राप्त परिसंस्था..

**विषय : - विद्यापीठात सुरु करण्यात आलेल्या विद्यार्थी सहाय्यता केंद्रा बाबत..**

**महोदय / महोदया,**

विद्यार्थ्यांना e-Suvidha पुरविण्यासाठी विद्यापीठाने एमकेसीएल सोबत सामजंस्य करार करण्यात आला आहे. या प्रकल्पातंर्गत कला,विज्ञान व वाणिज्य, शिक्षणशास्त्र, शारिरीक शिक्षणशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, अभियांत्रिकी, विधी, समाजकार्य विद्याशाखा व व्यवस्थापन विद्याशाखेतील एकुण ४५००० विद्यार्थी व १७५ महाविद्यालये ऑनलाईन पध्दतीने जोडली गेलेली असून या प्रकल्पाचे कामकाज हे अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित आहे. या प्रकल्पाचा पुढील भाग म्हणून विद्यापीठात विद्यार्थी सहाय्यता केंद्र सुरु करण्यात आलेले आहे.

**1.** याकरिता विद्यार्थ्यांसाठी **0257-2258418** हा दूरध्वनी क्रमांक (Helpline) उपलब्ध करुन देण्यात आलेली असून या दूरध्वनी क्रमांकावर विद्यार्थ्यास ई-सुविधा अकांऊट कसे तयार करावे, परीक्षा अर्ज सादर करण्याची तारीख, परीक्षेचे वेळापत्रक, निकालाच्या संभाव्य तारखा, विद्यापीठातून विविध प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणासंदर्भातील कार्यपध्दती, विविध प्रवेश परीक्षांचे वेळा पत्रके,पात्रता विषयक माहिती, विद्यार्थ्यांशी संबंधित निर्गमित करण्यात येणा-या परिपत्रकांची माहिती इत्यादी या सहाय्यता केंद्रावरुन विद्यार्थ्यास मिळू शकेल.

विद्यार्थ्यांशी Online संपर्क साधता यावा यासाठी sfc@nmuj.digitaluniversity.ac हा ई-मेल आयडी तयार करण्यात आला असून या ई-मेल आयडी वर विद्यार्थ्यांनी माहिती मागितल्यास ती त्यास पाठविण्यात येईल.

भविष्यामध्ये या सहाय्यता केंद्राव्दारे विद्यार्थ्यांना आवश्यक असणारे सर्व प्रमाणपत्र जसे दुय्यम गुणपत्रक , पदवी प्रमाणपत्र, ट्रॅान्सक्रीप्ट,स्थानांतर प्रमाणपत्र,मायग्रेशन प्रमाणपत्र इत्यादी मिळण्यासाठी अर्ज स्वीकारणे व ते संबंधित विभागाने तयार करुन दिल्यानंतर वितरीत करणे ही कामे देखील केली जातील. त्यामुळे विद्यार्थ्यांना विविध विभागात जाण्याची गरज भासणार नसल्याने त्याचे श्रम व वेळ वाचणार आहे.

**2.** या सहाय्यता केंद्राव्दारे ई-सुविधा योजनेतंर्गत जोडलेल्या विविध महाविद्यालयांना डीजीटल कॉलेज /डीजीटल युनिर्व्हसिटी प्रकल्प हाताळतांना त्यांना दैनंदिन कामकाजात येणा-या अडचणी बाबतचे मार्गदर्शही करण्यात येणार आहे.

तरी सदर बाब सर्व विद्यार्थ्यांच्या व संबंधितांच्या निदर्शनास आणून देवून विद्यापीठाने उपलब्ध केलेल्या या सुविधेचा फायदा घ्यावा व विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

म.कळावे,

आपला विश्वासू,

Sd/-
**(डॉ.म.मु.पवार )**
**परीक्षा नियंत्रक**

**प्रत माहितीसाठी : -**
**मा.विभागप्रमुख - शैक्षणिक विभाग व सर्व प्रशासकिय अधिकारी, उमवि.,जळगाव.**